शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१
१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

# इयत्ता ११ वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१६-१७

## प्रसिध्दी पत्रक

दिनांक २०.०७.२०१६.

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१६-१७ साठी ची चौथी गुणवत्ता यादी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीमार्फत दि.१८.०७.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन जाहिर करण्यात आलेली आहे. त्याचे प्रवेश आज दुपारी ४.०० वाजेपर्यंत पूर्ण झालेले आहेत.

पहिल्या, दुस-या, तिस-या व चौथ्या गुणवत्ता यादीतील सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये दि. १५ ते २० जुलै दरम्यान संपुर्ण फी भरुन आपला प्रवेश निश्चित करणेबाबत यापुर्वी कळविण्यात आलेले होते. तथापि, पालक व विद्यार्थी यांच्या प्रवेशाबाबत तक्रारी प्रवेश समितीकडे प्राप्त झाल्या आहेत, विद्यार्थी व पालक यांच्या प्रवेशाबाबतच्या तक्रारीआधारे पुढील मार्गदर्शनासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. शासनाने पुढील प्रवेशाची कार्यवाही कोणत्या प्रकारे करावी याबाबतचे पत्र लवकरात लवकर दिले जाईल असे चर्चेदरम्यान सांगितले आहे. शासनाकडून आदेश प्राप्त होताच पुढील वेळापत्रक व सविस्तर सूचना वेबसाईटवर व वर्तमानपत्रात प्रसिध्द् केले जातील, त्यामुळे शिक्षण उपसंचालक कार्यालयात येऊन लेखी अर्ज देण्याची आवश्यकता नाही.

तरी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्राचार्य यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश मिळालेला आहे अशा विद्यार्थ्यांना संपुर्ण फी भरणेबाबत दि. ३० जुलै २०१६ अखेर मुदत वाढ देण्यात आलेली आहे, तरी सदर विद्यार्थ्यांना संपुर्ण प्रवेश फी भरण्याबाबत सक्ती करु नये व त्यांचे प्रवेश रद्द करु नये.

कोणत्याही परिस्थितीत कनिष्ठ महाविद्यालयाने इयत्ता ११ वी चे प्रवेश ऑफलाईन पध्दतीने करु नयेत. अशा प्रकारे केलेले प्रवेश रद्द केले जातील आणि सदर ऑफलाईन प्रवेशाची संपुर्ण जबाबदारी संबधित कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

MRaut 20.7.16

(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१